
# मुक्तिपूर्व कालखंडातील गोमंतकीय मराठी कथा

डॉ. सोमनाथ कोमरपंत



गोमंतकाच्या मुक्तिपूर्व कालखंडातील मराठी कथावाङ्मयाचे विहंगमावलोकन करताना विसाव्या शतकाचे तिसरे दशक हा प्रारंभबिंदू मानावा लागेल. मराठी कथाविश्वात हरिभाऊ आपटे यांच्या 'स्फुट गोष्टी' च्या लेखनाने पहिल्या पाऊलखुणा उमटल्या. 'स्फुट गोष्ट', 'संपूर्ण गोष्ट', 'लघुकथा' आणि 'नवकथा' असे मराठी कथेच्या उत्क्रांतिमार्गातील चार महत्त्वाचे टप्पे आहेत. या विविध स्थित्यंतरांतून गेलेल्या मराठी कथेला एका शतकाचा इतिहास आहे. गोमंतकात मराठी साहित्याची प्रदीर्घ परंपरा असूनही आणि परकीय राजवटीत नियतकालिकांचा उदय होऊनही समांतर प्रक्रियेने कथेच्या आधुनिक पर्वाला खऱ्या अर्थाने प्रारंभ झाला नव्हता. येथील आधुनिक वळणाच्या कथावाङ्मयाच्या निर्मितीमागील प्रेरणांचा शोध घेताना तत्कालीन परिस्थितिजन्य घटकांचा परामर्श सारांश रूपाने घ्यावा लागेल. ललित वाङ्मयाची निर्मिती करणारा सृजनशील साहित्यिक हा समाजमनाचा उद्‌गाता असतो. समाजाची मानसिक आंदोलने, निःश्वासिते तो आपल्या प्रतिभेने मुखर करीत असतो. त्याचे जीवनानुभवाचे आकलन सृजनशील साहित्यातून प्रकट होत असते. आत्मानुभूतीचा मोकळा अवकाश आणि सतत अभिसरण प्रक्रियेत गुंतलेले सांस्कृतिक पर्यावरण गोमंतकात नव्हते ही वस्तुस्थिती आहे. साहित्यानिर्मितीस पोषक असणाऱ्या संवेदनशीलतेचा अभाव त्या काळात होता. वाङ्मयीन अभिरूचीच्या संवर्धनासाठी आवश्यक असणारी मानसिकताही आढळत नव्हती.


ऐतिहासिक अपघातामुळे गोमंतक आपल्या मातृभूमीपासून दुरावला. राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक दृष्ट्या येथील समाजाला अवनतावस्था प्राप्त झाली. जनजीवनातील चैतन्य लोप पावून शैथिल्य आले. अव्याहतपणे चालत आलेल्या येथील जीवनप्रणालीवर आघात करणाऱ्या परकीय विघातक शक्ती दीर्घकाळापर्यंत येथे प्रबल ठरल्या. त्यामुळे साहित्याच्या माध्यमातून अभिव्यक्त होणारा आत्मिक स्वर या काळात क्षीण ठरला. मुक्तिपूर्व गोमंतकातील कथा वाङ्मयाच्या व अन्य वाङ्मय प्रकारांच्या सामर्थ्य व मार्यादांचा विचार करतांना हा संदर्भ ध्यानात घ्यावा लागतो.

या सामाजिक क्षीणतेचे दर्शन घडविण्यात वि. स. सुखटणकरांना यश प्राप्त झाले. त्यांचा 'सह्याद्रीच्या पायथ्याशी' हा कथासंग्रह १९३१ मध्ये प्रसिद्ध झाला. दडपल्या गेल्या गोमंतकीय जनमानसाचा स्वर मुखर करण्यासाठी सुखटणकरांनी द्रष्टेपणाने काही पावले टाकली. त्यातून मराठी कथाविश्वात प्रादेशिक कथेची पाऊलवाट तयार झाली. योग्य वेळी या क्रान्तदर्शी पावलांना प्रोत्साहन देणारा समानधर्मी भेटावा लागतो. त्र्यं. शं. शेजवलकरांनी 'भूमिप्रेम हा सुखटणकरांच्या एकंदर कथालेखनाचा पाया आहे' असे लिहून त्यांच्या कथालेखनाचा परामर्श घेतला. मडगांवला १९३५ मध्ये भरलेल्या पहिल्या मराठी साहित्य संमेलनातील अध्यक्षीय भाषणात वि. स. सुखटणकर, प्रा. लक्ष्मणराव सरदेसाई व जयवंतराव सरदेसाई यांनी मराठी कथाविश्वात आणि बोरकर-कारे यांनी काव्यविश्वात कीर्ती मिळविल्याचा आवर्जून उल्लेख केलेला आहे.

वि. स. सुखटणकरांच्या कथा वाचताना प्रादेशिकतेचे मर्म त्यांनी किती समरसतेने समजून घेतले होते याचा प्रत्यय येतो. अंतर्भेदी प्रतिभेचे वरदान असल्याखेरीज प्रादेशिक चित्रणाला वैशिष्ट्यपूर्ण साहित्यरूप येत नाही. छोट्या प्रदेशातील सूक्ष्म

तरंगांचे चित्रण करता करता विश्वात्मकतेकडे झेपावण्याची संधी या प्रादेशिक चित्रणात असते. सीमित अवकाश असला तरी द्रष्टेपणा (vision) सीमित नसतो. त्यात प्रतिभेने कितीतरी रंगछटा दाखविता येतात. माती आणि माणूस यांच्या अतूट अनुबंधांचे साऱ्या चैतन्य कळांसह चित्रण करण्याची ही क्षमता वि. स. सुखटणकरांमध्ये होती. म्हणून आजही 'सह्याद्रीच्या पायथ्याशी' या कथासंग्रहातून रसरशीत परिसर चित्रणाचा प्रत्यय येतो. आपल्या या अंगभूत सामर्थ्याने व वैशिष्ट्यपूर्ण कथालेखनाने त्यांनी तत्कालीन रसिकांचे लक्ष वेधून घेतले. तत्कालीन साहित्यिकांमध्ये कलात्मकतेच्या भानापेक्षा जीवनसमस्यांची जाणीव अधिक होती. तत्कालीन परिस्थितीचा तो परिपाक होता. वातावरणनिर्मितीचे सामर्थ्य या कथांत आहे. 'आजचे व कालचे गोमंतक' त्यांनी रंगविले आहे. प्राचीन इतिहासाचा मागोवा घेत घेत ते वर्तमानकालीन दृश्ये टिपतात. राजकीय गुलामगिरीमुळे सामाजिक नीतिमूल्ये त्या काळात रसातळाला गेली होती. लोकांची आर्थिक कुचंबणा झाली होती. सामान्य जनता स्वत्वशून्य झाली होती. आत्मा गमावून बसलेल्या तत्कालीन समाजाच्या भीषण स्थितीचे वर्णन वि. स. सुखटणकरांनी 'ताम्रपट', 'वरंडा', 'महापुराची शिकवण' या कथांमधून केलेले आहे. 'दुबळी श्रीमंती' या कथेत परकीय सत्तेने केलेला जुलूम निर्लज्जपणे सहन करून त्यांची वरून खुशामत करणारी हीन प्रवृत्ती त्यांनी चित्रित केलेली आहे. त्यामुळे वाचक अंतर्मुख होतो.

'सह्याद्रीच्या पायथ्याशी' या कथासंग्रहातील 'जाईजुई', 'ताम्रपट', 'महापुराची शिकवण', 'दुबळी श्रीमंती' आणि 'वंदे मातरम्' या वास्तवाधिष्ठित कथा आहेत. 'पाद्र्याची पुण्याई' व 'वरंडा' या कथांना काहीशी ऐतिहासिकतेची डूब दिलेली आहे. 'वरंडा' व 'वंदे मातरम्' या कथांमधून गोमंतकाच्या स्वातंत्र्यासाठी झुंज देणाऱ्या स्वातंत्र्यसेनानींच्या विफल प्रयत्नांचे चित्रण केलेले आहे. 'सह्याद्रीच्या पायथ्याशी' मध्ये तो काळ आणि ती माणसे दृग्गोचर करणारी निवदेनशैली आढळते. एक भव्य जीवनपट या दीर्घ स्वरूपाच्या कथांतून साकारतो. यात गोमंतकीय जनजीवनाचे कंगोरे जसे आढळतात तसेच लेखकाचे जीवनभाष्यही येते. वि. स. सुखटणकरांनी येथील मनुष्यस्वभाव, सामाजिक व सांस्कृतिक जीवन यांचे सूक्ष्म निरीक्षण केलेले आहे. त्यांनी कथेच्या प्रवाहात समुचितपणे पेरलेल्या म्हणी, वाक्प्रचार, शब्दप्रयोग आणि लोकसमजुती यांमधून त्यांच्या या



अवलोकन शक्तीचा प्रत्यय येतो. त्या काळातही त्यांनी जीवनाच्या समग्रतेचे दाखविलेले प्रगल्भ भान लक्षणीय मानावे लागेल. निवेदनात गोष्टी वेल्हाळपणा आणि कथेची बांधणी वरपांगी सैलसर वाटत असली तरी त्यांची आशयसूत्रावरची पकड सुटत नाही.

'सह्याद्रीच्या पायथ्याशी' हा गोमंतकीय मराठी कथेचा मानदंड आहे आणि एकूण मराठी कथाविश्वातील मैलाचा दगड आहे असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरू नये.


वि. स. सुखटणकरांप्रमाणे प्रा. लक्ष्मणराव सरदेसाई आणि पंडित महादेवशास्त्री यांनी कथालेखनात प्रादेशिकतेची वाट चोखाळली. दोघांचे गोमंतकीय मराठी कथासृष्टीत महत्त्वाचे स्थान आहे. प्रा. लक्ष्मणराव सरदेसाई यांनी मुक्तिपूर्व काळात आणि मुक्तिनंतर जवळजवळ सातशे कथा लिहिल्या. मुक्तिपूर्व कालखंडात त्यांचे 'कल्पवृक्षाच्या छायेत', 'सागराच्या लाटा', 'वादळातील नौका', 'अनीतीचे दिव्य', 'ढासळलेले बुरूज' 'संसारातील अमृत', 'मधुचंद्र', 'मोहोर' व 'लक्ष्मणरेषा' (निवडक कथा) हे संग्रह प्रसिद्ध झाले. गोमंतकीय समाजजीवनातील वृत्ति-प्रवृत्तींचे सूक्ष्म चित्रण त्यांच्या कथेत आढळते. या बाबी त्यांनी आपल्या कथाबीजांत मुरवून घेतलेल्या आहेत. त्यांच्या कथेतील भाषेचे माधुर्य, लालित्य, प्रसंगचित्रण आणि वातावरणनिर्मिती मन आकर्षून घेते. 'प्रादेशिकतेशिवाय जिवंत कथासाहित्य असू शकत नाही.' आणि गोमंतकीय साहित्यात गोमंतकीय जीवनच दिसले पाहिजे. अशी त्यांची ठाम लेखन भूमिका आहे. प्रादेशिकता आणि विश्वात्मकता यांत मूल्यदृष्ट्या द्वैत नाही. याऊलट ते एकात्म आहे असे त्यांना वाटते. साहित्याचे पोषण भूमीतून होत असल्यामुळे सांस्कृतिक संचिताचे यथायोग्य व प्रगल्भ आकलन हाच सृजनप्रक्रियेचा मूलस्त्रोत असतो असे त्यांना वाटते. त्यांच्या या सखोल चिंतनशीलतेचे व जीवनाच्या सर्व रंगछटा शोषून घेणाऱ्या समृद्ध व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब त्यांच्या कथालेखनात आढळते. कथासंख्या विपुल असूनही त्यांनी कथालेखनात गुणवत्ता टिकविलेली आहे. मानवी व्यक्तिरेखांचे विविध आकार शोधण्यात त्यांची प्रतिभा मग्न आहे. त्यांचा पिंड सौंदर्योपासकाचा. जीवनाच्या सुसंगतीत ते रमतात. परंतु वृत्ती स्वप्नाळू नव्हे. वास्तव सृष्टीचे आणि माणसांचे त्यांना कुतूहल आहे. डोळसपणे ते सारे पाहतात. त्यातील विसंगतीमुळे त्यांच्या संवेदनशील मनाची तीव्र तडफड होते. तिचा सृजनात्मक अंगाने

विकास होऊन अम्लान शब्दकळेद्वारा, प्रवाही शैलीद्वारा प्रभावी रीतीने व्यक्त होते. गोमंतकाच्या भूमीशी जडलेला दृढ अनुबंध हा त्यांच्या अनुभूतीचा गुलकंद आहे. ढासळत चाललेल्या कुटुंबव्यवस्थेला संजीवनी लाभावी असे त्यांना वाटते. समाजातील स्थित्यंतरांकडे साहित्यिक विचारवंत या नात्याने ते तटस्थपणे पाहू शकत नाहीत. कलात्मक स्पंदने 'ढासळलेले बुरूज' कल्यवृक्षाच्या छायेत' 'मोहोर' या कथासंग्रहात आढळतात. सरदेसाई वास्तवातील व्यक्तिचित्रे रंगवितात तेव्हा त्या त्या व्यक्तिमत्त्वाचा सोलीव गाभाच वाचकासमोर रेखाटतात. त्यांच्या मनाने कल्पिलेले हे आदर्शांचे पूजन त्यांच्या काही कथातून आढळते (उदा. सफ्फा मस्जीद) पण या जीवनभाष्यात प्रचाराचा लवलेश नसतो. त्यांच्या 'मोहोर', 'राण्यांचा शब्द' किंवा 'धराण्याची तलवार' या कथात गोमंतकाच्या गतवैभवाची क्षणचित्रे आढळतात. त्यांच्या प्रादेशिक वळणाच्या कथेतून निसर्गचित्रण येते. पण निसर्गाविषयी वाटणारी अपूर्वाई म्हणून हे चित्रण येत नाही. लक्ष्मणराव सरदेसाई यांना अभिप्रेत असणारी भावसृष्टी साकार करताना परिपोषक द्रव्य म्हणून समतानतेने हा निसर्ग रेखाटला जातो. त्यातील चित्रमयता खरोखर प्रशंसनीय आहे.

उदा. ''माडीवर ऑर्गनचे सूर घुमू लागले. ह्या कंपमय वातावरणात ती लहानाची मोठी झाली होती. आपल्या दर्शनाने आणि आवाजाने हुरहुर उत्पन्न करणारी सुरूची झाडे खिडकीतून दिसत होती. संध्यासमयीच्या उदास शांततेने त्या झाडांचे दीर्घ नि:श्वास स्पष्ट ऐकू येत होते.... रस्त्याच्या पलीकडे पसरलेला तळ्यातील काळ्याभोर पृष्ठभागावर पिवळसर रंगाची कमळे कुतुहलाने आकाशाकडे पहात होती आणि नारळीच्या राईतून बांबूची मुरली वाजवीत गुराख्यांची पोरे गुरांच्या कळपांमागून एक प्रकारच्या बेदरकार वृत्तीने परतत होती.''

'साक्षात्कार' या कथेत ग्रामीण परिसरातील झोपडीचे हुबेहूब वर्णन केलेले आहे.


गोमंतकाच्या भूमीचा स्पंदनकारी आत्मा नेमकेपणाने लक्ष्मणराव सरदेसाई यांना सापडलेला होता. याची प्रचीती 'मोहोर', 'चांडाळ', वादळातील नौका,' गुन्हेगार, 'निवारा,' 'शाळामास्तर', 'जीवनाचे मोल', 'मायेचा वारसा' आणि 'पाषाण' इ. कथांतून आढळते प्रा. लक्ष्मणराव सरदेसाई यांच्या आशयसंपन्न कथेने मराठी कथासृष्टीत लक्षणीय भर टाकलेली आहे.



पंडित महादेवशास्त्री जोशी यांचे वङ्मयीन व्यक्तिमत्त्व अष्टपैलू स्वरूपाचे. त्यातील कथाकार हाही त्यांचा तेजस्वी पैलू. आपल्या कथालेखनात त्यांनी सत्तरी आणि पंचक्रोशीतील परिसर समर्थतेने रेखाटला आहे. अनागर भागातील जनजीवनाचे, त्यांच्या व्यथा-वेदनांचे आणि आशा-आकांक्षांचे चित्रण त्यांनी तन्मयतेने केलेले आहे. हरिभाऊ आपटे यांच्या कथालेखनात आलेला कुटुंबकथेचा धागा त्यांच्या कथालेखनात आढळतो. कौटुंबिक जीवनातील सनातन भावनांचा आणि माणसामाणसांतील नातेसंबंधांचा वेध ते कलात्मक पातळीवरून घेतात. मुक्तिपूर्व कालखंडात त्यांचे 'वेलविस्तार' (१९४१), 'खडकातले पाझर', 'विराणी', 'मोहनवेल,' 'भावबळ', 'प्रतिमा,' 'घररिघी', 'कथाकांता' (निवडक कथा) 'कल्पित' आणि 'सत्य', 'पुत्रवती' व 'कन्यादान' हे संग्रह प्रसिद्ध झाले. त्यांनी संस्कृतिकोश कार्यात स्वत:ला गुंतवून घेतल्यामुळे कथालेखन सोडून दिले.

प्रभावी व्यक्तिचित्रण हे त्यांच्या कथालेखनातील महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. दु:खात पिचत रहाणाऱ्या अभागी माणसांच्या दु:ख-व्यथांचे ते चित्रण करतात. त्यांच्या या कथासंभारात स्त्रीदु:खाच्या 'कहाण्या' प्राधान्याने आलेल्या आहेत. पारंपरिक जीवनपद्धतीत स्त्रीची होणारी ससेहोलपट हा तसा सनातन विषय. पण पं. महादेवशास्त्री जोशी यांनी सहानुभूतीने अशी व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत. 'अरत्र ना परत्र' 'वैशाखवणवा', 'तो मला हवा आहे' 'घररिघी', 'भावबळ' या कथा या दृष्टीने उल्लेखनीय वाटतात. त्यांच्या कथांत दु:खाचे कढ आहेत. स्त्रीमनातील असोशी आहे. पण अतिरंजितता नाही. संयम आहे. सुष्ट-दुष्ट प्रवृत्तींचे चित्रण करताना केवळ भाबडेपणा नाही. मनुष्यस्वभावाचे त्यांचे आकलन प्रगल्भ आहे. मात्र त्यांच्या संवेदनशील मनाचा रोख जीवनाच्या सत्प्रवृत्तीकडे, उदात्ततेकडे झुकणारा आहे. त्यामुळे त्यांच्या कथेतील सत्त्वशील माणसे आणि त्यांची जीवनोत्सुकता मनात घर करून राहते. मानवी जीवनातील व्यूह रेखाटताना जुन्या-नव्या कथेच्या वळणाचे अंधानुकरण न करता व्रतस्थपणे आपली स्वत:ची वाट चोखाळली आहे. व्युत्पन्नता, रसिकता, शब्दप्रभुत्व यांचा त्रिवेणी संगम त्यांच्या कथानिवेदन पद्धतीतून प्रत्ययास येतो. आलंकारिकतेचा सोस न बाळगता बोलभाषेचा गोडवा घेऊन त्यांनी व्यक्तिरेखा रेखाटल्या आहेत. माणसांबरोबरच तेथील निसर्गाची पार्श्वभूमी साऱ्या तपशिलांसह त्यांच्या कथालेखनात

अवतरते.



पंडित महादेवशास्त्री जोशी यांनी संस्कृतमधील आर्ष व विदग्ध वाङ्मयाचा व्यासंग केलेला आहे. प्राचीन मराठी वाङ्मयाचा त्यांचा अभ्यास आहे. समकालीन वाङ्मयीन अंत:प्रवाहांचे त्यांना भान आहे. त्यांनी स्वत:ची अशी वाट चोखाळलेली आहे. मौखिक परंपरेतील सत्त्वांश त्यांनी आपल्या भाषाशैलीत मुरवून घेतलेला आहे. त्यांची शब्दकळा प्रसन्न आणि प्रवाही वाटते. माणसांच्या अंत:करणातील भावभावनांची आंदोलने आणि सूक्ष्म संवेदना पेलण्याचे सामर्थ्य त्यांच्या या पारंपरिक वळणात आहे. हरिभाऊ आपटे, य. गो. जोशी यांनी कुटुंबकथेचा प्रवाह समृद्ध केला. पंडित महादेवशास्त्री जोशी यांनी गोव्याच्या भूमीचे गहिरे रंग त्यात आणले. मराठी कथेला हे नवे परिणाम त्यांनी मिळवून दिले. प्रादेशिकता आणि कुटुंबचित्रे यांचा गुणसंगम शास्त्रीबुवांच्या कथेत आढळतो. या तीन कथाकारांच्या कथांमुळे गोमंतकीय कथेला समृद्ध वारसा लाभला.

या कथाकारांशिवाय मुक्तिपूर्व कालखंडात जयवंतराव सरदेसाई (सुखाचे क्षण, गुलाब गेंद), सां. घ. कंटक (शहाळी, १९४१), का. पुं. घोडे (सुखसंवाद, १९३७), ह. वि. देसाई (उंबरांची फुले, १९४०), बा. द. सातोस्कर, प्रा. स. शं. देसाई, बा. भ. बोरकर (प्रियदर्शिनी १९६०) व्यंकटेश पै. रायकर, यांनी कथालेखन केले.

प्रा. मनोहर हिरबा सरदेसाई यांनी मुक्तीनंतरच्या कालखंडात सातत्याने विपुल कथालेखन केले. जयवंतराव सरदेसाई, व्यंकटेश पै रायकर, का. पुं. घोडे यांच्या कथा तुरळकपणे नियतकालिकांतून प्रसिद्ध झाल्या. त्यांचे संग्रहही निघाले. मनोहर हिरबा सरदेसाई यांनी गोमंतकाच्या परिसरापुरते आपले कथालेखन सीमित केले नाही. त्यांच्या कथातील पात्रे अन्य प्रदेशातही वावरताना दिसतात. बा. द. सातोस्कर यांनी १९३७ मध्ये गोमंतकीय कथाकारांचा 'कुळागर' हा प्रातिनिधिक संग्रह प्रकाशित केला होता. तत्कालीन कथालेखकांच्या १२ प्रादेशिक वळणाच्या कथा त्यात प्रामुख्याने आढळतात. गोमंतकीय जीवनाच्या छटा, गोव्याचा मुक्तिसंग्राम, ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेल्या कथा आणि रंजनवादी मूल्य असलेल्या कथा असे या कथांचे सर्वसाधारण स्वरूप आहे.

मुक्तिपूर्व कालखंडात व्यक्तिस्वातंत्र्याचा, लेखनस्वातंत्र्याचा सर्वतोपरी संकोच होत असतानादेखील या कथा लेखकांनी प्रतिकूल परिस्थितीतही कथालेखन केले. त्यांची कथा महाराष्ट्रातील यशवंत, ज्योत्स्ना, अभिरूची, सत्यकथा, या वाङ्मयीन अभिरूची सजगतेने जोपासणाऱ्या नियतकालिकांतही प्रसिद्ध होत होती. गोमंतकीय हे बिरूद न लावता एकूण मराठी साहित्य प्रवाहात समरस होऊन लिहिण्याची प्रेरणा या काळात होती असेही निरीक्षण या कालखंडाविषयी नोंदविता येईल.

●●●